सकाळ

**२ एप्रिल, २०११**

# जारो एज्युकेशनचे ऑनलाईन अभ्यासक्रम

**चुनीभट्टी (बातमीदार): जारो एज्युकेशन संस्थेने इंटरनॅशनल फायनान्शिअल रिपोर्टिंग स्टँडर्ड्स (आयएफआरएस) आणि रूट टू जॉब्स नावाने दोन खास ऑनलाईन अभ्यासक्रम सुरू केले आहेत. यापैकी 'आयएफआरएस' हा आंतरराष्ट्रीय अकांऊटींग मानकांची मुलभूत तत्वे शिकविणारा अभ्यासक्रम आहे, तर रूट टू जॉब्स हा अभ्यासक्रम सर्वप्रकारच्या नोकऱ्यांच्या स्पर्धात्मक परिक्षांसाठी तयार करण्यात आलेला अभ्यासक्रम आहे. आयएफआरएस म्हणजे तत्वाधरित मानके आणि भाष्य इंटरनॅशनल अकाऊंटीग स्टँडर्ड बोर्ड (आयएएसबी) आणि तीची आद्यसंस्था इंटरनॅशनल अकाऊंटींग स्टँडर्ड कमिटी (आयएएससी) यांनी स्विकारलेला आराखडा आहे.जगातील १०० देशांतील १२०० हून अधिक सूचीबद्ध कंपन्या। आयएफआरएस मानकांचा  स्विकार करणार असल्याचे जारो एज्युकेशनचे संचालक संजय साळुंखे यांनी सांगितले.**